एस.सी.सी.३९/२०१५

निशाणी क्र. 21

साक्षीदार क्र.३ चा दोषारोपपूर्वीचा पुरावा

शपथेवर कथन करतो की,

नांव – रफीक उस्मान पठाण

वय – ४८ वर्ष, व्यवसाय – मेकॅनिक

राहणार – जवळवाडी, ता.जावली, जि. सातारा

फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास फियादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.जी.गोरे यांचेमार्फत सुरु

१. मी जवळवाडी तर्फ मेढा येथे राहण्यास आहे. मी आरोपी संजय शंकर डिगे व विनोद शंकर डिगे यांना ते आमच्या शेजारी राहण्यास असल्यामुळे ओळखतो. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये जागेवरुन वाद आहे. आरोपी व फिर्यादीची घरे शेजारीशेजारी आहेत. त्यांची जमीनीची केस न्यायालयात चालू आहे. दि.०५.११.२०१४ रोजी संपत चिमाडी डिगे यांची भिंत पडलेली होती. आरोपींनी फिर्यादीचे राहिलेले घर पाडले. आरोपींनी त्यांची ट्रॅक्स क्र.एमएच-११-ए-३८६ हिने धडका देवून भिंती पाडल्या. त्यानंतर आरोपी व फिर्यादी यांची भांडणे झाली. आम्ही भांडणे सोडवायला गेलो होतो परंतू, त्यांनी आमचे काहीएक ऐकले नाही. आरोपींनी फिर्यादीस धक्काबुक्की व मारहाण केली. आरोपींनी आम्हाला आमच्या भांडणात मध्ये पडू नका, नाहीतर तुम्हाला बघून घेईन अशी धमकी दिली. त्यानंतर आम्ही तेथून निघून गेलो.

सरतपास पूर्ण.

आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.ए.एस.देशमुख यांनी उलटतपास घेण्याचा अधिकार राखून ठेवला.

श्रवणोत्तर स्वीकृत

26/04/2023

रविंद्र भ. खवले,

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.

दि.२६.०४.२०२३